**ठळक बातम्या**

- भारत आणि युरोपियन युनियन यांच्यात ऐतिहासिक मुक्त व्यापार कराराची घोषणा / व्यापार, सुरक्षा, संरक्षण भागीदारी, गतीशिलता, आपत्ती जोखीम व्यवस्थापन आणि ग्रीन हायड्रोजन आदी करारांचा समावेश

- संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन उद्यापासून, अर्थसंकल्प येत्या १ फेब्रुवारीला सादर होणार

- महाराष्ट्रातल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचं 'पीएम सेतू' योजनेंतर्गत आधुनिकीकरण करण्याच्या योजनेला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

**आणि**

- १९ वर्षाखालच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत सुपर सिक्स फेरीतल्या सामन्यात भारताचं झिम्बाब्वेपुढं विजयासाठी ३५३ धावांचं आव्हान

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष अँतिनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन देयर लेन यांच्या झालेल्या शिष्टमंडळ स्तऱावरील चर्चेनंतर भारत आणि युरोपियन युनियन यांच्यात ऐतिहासिक मुक्त व्यापार कराराची घोषणा  झाली.  यात व्यापार, सुरक्षा, संरक्षण भागीदारी, गतीशिलता, आपत्ती जोखीम व्यवस्थापन आणि ग्रीन हायड्रोजन आदी करारांचा समावेश आहे.

**हा करार** ऐतिहासिक असून यामुळे शेतकरी तसंच सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योजकांना फायदा होईल, असं प्रधानमंत्री संयुक्त निवेदनात म्हणाले. हे करार जागतिक स्थिरतेसाठी आवश्यक असल्याचं ते म्हणाले. भारत आणि युरोपियन

युनियन यांच्यातला मुक्त व्यापार करारामुळे उत्पादन आणि सेवा क्षेत्राला चालना मिळेल, असंही मोदी म्हणाले.

**होल्ड बाईट मोदी**

हा करार एक ऐतिहासिक क्षण असून यामुळे युरोपियन युनियन आणि भारत यांच्या संबंधाचा एक नवा अध्याय सुरू झाला आहे, आज भारत आणि युरोपियन युनियन एक विश्वासार्ह भागीदार म्हणून उभे आहेत, असं  युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष एँतिनियो कोस्टा म्हणाले. तर भारत आणि युरोपियन युनियन यांच्यात झालेला मुक्त व्यापर करार हा सर्व करारांची जननी आहे असं युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुला वॉन देयर लेन म्हणाल्या. भारतीय अर्थव्यवस्थेचं यश जगाच्या अर्थव्यवस्थेला स्थैर्य देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला….

**होल्ड बाईट उर्सला (२८ सेकंद)**

**<><><><><><>**

नवी दिल्लीत आज दुपारी झालेल्या भारत - युरोपियन युनियन बिझनेस फोरमचं अध्यक्षपद प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्ष उर्सुुला वॉन देयर लेन यांनी संयुक्तपणे भूषवलं. या फोरममध्ये दोन्ही बाजूंचे उद्योग जगतातले नेते सहभागी झाले होते. यात भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातल्या आर्थिक भागीदारीविषयी व्यापक चर्चा झाल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं सांगितलं. युरोपियन युनियनमध्ये भारताची गुंतवणूक आतापर्यंच ४० अब्ज युरोपर्यंत पोहोचली आहे, उत्पादन आणि सेवा क्षेत्रासह सर्व क्षेत्रात भारत आणि युरोपियन युनियन यांच्यात घनिष्ट सहकार्य आहे, असं प्रधानमंत्री मोदी या फोरमला संबोधित करताना  म्हणाले.

**<><><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला उद्यापासून सुरुवात होत आहे. त्या पार्श्वभूमीवर महत्त्वाच्या राष्ट्रीय मुद्द्यांवर आणि कामकाजावर चर्चा करण्यासाठी,

आज नवी दिल्लीत सर्वपक्षीय बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते.

२०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठीचा केंद्रीय अर्थसंकल्प १ फेब्रुवारी रोजी सादर केला जाणार आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा येत्या १३ फेब्रुवारीपर्यंत चालणार असून त्यात राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रस्तावावर चर्चा होईल. दुसरा टप्पा ९ मार्च ते २ एप्रिल या कालावधीत होणार असून त्यात अर्थसंकल्पावर चर्चा होईल असं संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं. अधिवेशनाचं कामकाज सुरळीत व्हावं याकरता सर्व पक्षांनी सहकार्य द्यावं असं आवाहन त्यांनी केलं.

<><><><><><>

शाश्वत आणि सुरक्षित वाहतूक व्यवस्थेकरता नवोन्मेषी संशोधनाची गरज असल्याचं केंद्रीय अवजड उद्योग मंत्री एच. डी. कुमारस्वामी यांनी म्हटलं आहे. वाहन तंत्रज्ञानाविषयी पुण्यात आयोजित आंतरराष्ट्रीय परिसंवादाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. आत्मनिर्भर भारत अभियानाच्या यशाकरता संशोधक आणि उद्योजकांनी अभिनव तंत्रज्ञान विकसित करावं असं आवाहन त्यांनी केलं. पर्यायी इंधन, विजेवरची वाहनं आणि वाहनांमधे सुरक्षिततेच्या अत्याधुनिक सोयीसुविधा या क्षेत्रात आत्मनिर्भरतेचं उद्दिष्ट ठेवावं असं ते म्हणाले.

<><><><><><>

विद्यापीठ अनुदान आयोगाचे नवे दिशानिर्देश शैक्षणिक संस्थांमधे जातिभेदाधारित गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी जारी केले असून, त्यांचा गैरवापर होणार नाही, अशी ग्वाही केंद्र सरकारनं दिली आहे. शैक्षणिक संस्थांमधे जातिभेदामुळे अन्याय किंवा इतर गैरवर्तन रोखण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांनी समान संधी केंद्र, समता समित्या, तक्रार निवारण यंत्रणा आणि चोवीसतास चालणाऱ्या हेल्पलाईन सुरु कराव्यात, अशा सूचना आयोगानं १३ जानेवारीला

जारी केल्या होत्या. त्यांचा गैरवापर होऊ नये ही केंद्र आणि राज्य सरकारची जबाबदारी असल्याचं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सांगितलं. हा विषय न्यायप्रविष्ट असून संविधानाच्या चौकटीतच सर्व कार्यवाही होईल, असं ते म्हणाले.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या आयटीआय, अर्थात औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचं 'पीएम सेतू' योजनेंतर्गत आधुनिकीकरण करण्याच्या योजनेला राज्य मंत्रिमंडळानं आजच्या बैठकीत मान्यता दिली. त्यानुसार पहिल्या टप्प्यात नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे या जिल्ह्यांमधल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये या योजनेची अंमलबजावणी केली जाईल. पुढच्या टप्प्यात इतर संस्थांचा समावेश केला जाणार असल्याचं राज्य शासनाच्या प्रसिद्धिपत्रकात म्हटलं आहे. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला जोडणाऱ्या मेट्रो मार्गिका ८ ला आज मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर ६६ किलोमीटरपेक्षा जास्त लांबीच्या नाशिक शहर परिक्रमा मार्गासाठी एकूण ३ हजार ९५४ कोटी रुपयांच्या खर्चालाही या बैठकीत मान्यता देण्यात आली.

<><><><><>

१९वर्षाखालच्या क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज झिम्बाब्वेत बुलवायो इथं सुरु असलेल्या सुपर सिक्स फेरीतल्या सामन्यात भारतानं झिम्बाब्वेपुढं विजयासाठी ३५३ धावांचं आव्हान ठेवलं आहे. झिम्बाब्वेनं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केल्यावर भारतानं निर्धारित ५० षटकात ८ गडी गमावून ३५२ धावा केल्या. त्यात विहान मल्होत्राच्या नाबाद १०९ धावांचा मोलाचा वाटा आहे. अभिमन्यू कुंडूनं ६१, तर वैभव सूर्यवंशी ५२ धावांचं योगदान दिलं. शेवटची बातमी हाती आली तेव्हा झिंबाब्वेच्या ३४ षटकात ५ बाद १४२ धावा झाल्या होत्या.

<><><><><><>

ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाचा वेगवान गोलंदाज केन रिचर्डसननं आज व्यावसायिक क्रिकेटमधून निवृत्त होत असल्याची घोषणा केली. १७ वर्षांच्या प्रशंसनीय कामगिरीदरम्यान रिचर्डसन २५ एकदिवसीय आणि ३६ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळला आहे. तो २०२१ चा टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या ऑस्ट्रेलियन संघातही समाविष्ट होता.

<><><><><><>

आत्मनिर्भरता ही आता एक राष्ट्रीय स्तरावरचा दृष्टीकोन बनला असून ऑपरेशन सिंदूरने भारताच्या स्वदेशी प्रणालीची परिचालन सज्जता मजबूत असल्याचं सिद्ध केलं आहे, असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी केलं. ते आज नवी दिल्लीत डीआरडीओ शास्त्रज्ञांच्या सत्कार समारंभात बोलत होते. गेल्या दशकात सरकारच्या आत्मनिर्भरतेच्या प्रयत्नांमुळे संरक्षण निर्यातीत वाढ झाली असून ती २०१४च्या १ हजार कोटींच्या तुलनेने २४ हजार कोटी रुपयांवर पोहचल्याचंही सिंह म्हणाले. हा कार्यक्रम शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आणि नवसंशोधकांचा सन्मान करण्यासाठी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात डीआरडीओ पुरस्कार योजना २०२४च्या विजेत्यांना राजनाथ सिंह यांच्या हस्ते पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं.

<><><><><><>

बँकाचा कामकाजाचा आठवडा पाच दिवसांचा करावा या प्रमुख मागणीसाठी आज सर्व राष्ट्रीयकृत आणि सार्वजनिक बँकांच्या कर्मचाऱ्यांनी एक दिवसाचा संप केला. या मागणीवर विचार झाला नाही तर बेमुदत संपावर जाण्याची तयारी असल्याचं आंदोलकांनी सांगितलं.

//<><><><><><>//